

जैन दर्शन २

वैश्विक जैन यात्रास्थलदर्शन




डॉ. श्रेणिक सुरेश सरडे




जैन दर्शन

(भाग-२)

डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : ४ जुलै २०२५

लेखकाचा परिचय





मी डॉ. श्रेणिक सुरेश सरडे, राहणार कवठे पिराण तालुका ः मिरज. जिल्हा ः सांगली. माझे पदवी आणि पदव्युतर शिक्षण हे इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मध्ये झाले आहे. मी माझे डॉक्टरेट हे शिवाजी विदयापिठात इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मध्ये २०२४ ला पुर्ण केले आहे. मी १६ वर्षे झाले अभियांत्रिकी विदयालयात प्राध्यापक म्हणून काम करत आहे. ई साहित्यमध्ये माझे भयान रात्र, जैन धर्म आणि जैन धर्म (भाग - १) हे पुस्तक प्रकाशित झाले आहेत.


पत्ता ः कवठे पिराण

तालुका ः मिरज , जिल्हा ः सांगली (४१६४१७)

मोबाइल नंबर ः ९०११४६४८३८


जैन धर्म
श्रेणिक सुरेश सरडे
अहिंसा
परस्परोपग्रहो जीवानाम्
जैन धर्म


जैन धर्म
श्रेणिक सरडे


जैन दर्शन १
वैश्विक जैन यात्रास्थलदर्शन
डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

प्रस्तावना

जैन दर्शन (भाग - २) या पुस्तकात जैन धर्मातील धार्मिक स्थळांची माहिती दिली आहे. याची सर्वांना माहिती व्हावी हा यामागचा उद्देश आहे. या पुस्तकामध्ये कर्नाटक, महाराष्ट्र आणि तामिळनाडू या राज्यातील धार्मिक स्थळा बद्दल माहीती दिली आहे. या पुस्तकामध्ये जैन धर्मातील प्राचीन तिर्थस्थळाविषयी ही माहीती देण्यात आली आहे.

डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

पत्ता ः कवठे पिराण

तालुका ः मिरज. जिल्हा ः सांगली (४१६४१७)

मोबाइल नंबर ः ९0११४६४८३८

१. कर्नाटकातील धार्मिक स्थळे

१) मंदारगिरी दिगंबर जैन मंदिर ः

मंदारगिरी दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे कर्नाटकातील मदागोंडानहळळी, तुमकुरू येथे आहे. त्याला बसदी बेट्टा असेही म्हणतात. एक सुंदर गोल टेकडी आहे ज्यात अनेक १000 वर्ष जुनी जैन मंदिर आहेत. येथे पिंचीआकाराचे ८१ फूटांचे गुरूमंदिर आहे जे श्री शांतीसागर महाराज यांना समर्पित आहे. त्याचा शेजारी भगवान चंद्रप्रभू आणि बाहुबली ची मुर्ती आहे. या टेकडीच्या माथ्यावर ८00 - १000 वर्षापूर्वीची ४ लहान प्राचीन मंदिर आहे. त्यातील दोन भगवान चंद्रप्रभू व दोन भगवान पार्श्वनाथांना समर्पित आहेत.















२) श्री देशभूषण दिगंबर जैन शांतीगिरी ट्रस्ट, कोथळी ः

आचार्यवंत श्री देशभूषणजी महाराज यांनी क्षेत्र म्हणून विकसित केल्यावर या स्थळाला महत्त्व प्राप्त झाले. त्यांनी मंदिरे बांधण्यास सुरूवात केली. म्हणुन याला श्री देशभूषण दिगंबर जैन शांतीगिरी ट्रस्ट म्हणतात. हे ठिकाण कर्नाटकातील कोथळी (कुप्पणवाडी) येथे आहे. याच ठिकाणी आचार्यवंत श्री देशभूषणजी महाराज यांना समाधी मरण प्राप्त केले. तेथे भगवान शांतीनाथजी, भगवान चंद्रप्रभूजी आणि भगवान महावीरा ची भव्य मुर्ती आहेत.







३) केरे बसदी ः

केरे बसदी ही भारताच्या कर्नाटकातील उडपी जिल्हातील वरंगा गावात असलेले जैन मंदिर आहे. १२ व्या शतकातील हे मंदिर एका तलाव्याच्या मधोमध वसले

असून त्याला केरे बसदी (सरोवर मंदिर) असे नाव देण्यात आले आहे. याला चतुर्मुख बसदी ही म्हणतात कारण येथे तीर्थंकरांची चतुर्मुख मुर्ती आहे. हे मंदिर ८५० वर्षापूर्वीचे आहे. या मंदिराचे मूलनायक २३ वे तीर्थंकर पार्श्वनाथ आहेत. हे मंदिर चतुर्मुख शैलीत बांधण्यात आले आहे, ज्यात चार प्रवेशद्वार आहेत आणि एक चतुर्मुख मुर्ती आहे ज्यात भगवान पार्श्वनाथ, भगवान नेमिनाथ, भगवान शांतीनाथ व भगवान अनंतनाथ यांच्या प्रतिमा चार मुख्य दिशांचे प्रतिनिधित्व करतात. या मंदिरात पद्मावती देवीची मुर्ती आहे. मंदिरात जाण्यासाठी बोटीने जावे लागते.


तेथे नेमिनाथ बसदी ही ९ व्या शतकात बांधलेले दगडी मंदिर आहे. भगवान नेमिनाथांची पद्मासन अवस्थेत असलेली ५ फुटाची काळया रंगाची मुर्ती आहे. या मंदिरात १२ व्या शतकात बांधलेला ४५ फूट उंच अखंड मानस्तंभ आहे. येथे एक हजार वर्षापूर्वीची कठाळे बसदी, माथाडा बसदी आणि चंद्रनाथ बसदी ही महत्त्वाची मंदिरे आहेत.





५) पंचकूट बसदी ः

पंचकूट बसदी हे कर्नाटक राज्यातील मंडया जिल्हातील कंबादहळळी गावात वसलेले एक मंदिर आहे. हे मंदिर इ.स. ९००-१००० या काळातील आहे. येथे भगवान आदिनाथांची प्रतिमा आहेत. उजवीकडे भगवान शांतीनाथ आणि डावीकडे भगवान नेमिनाथ यांच्या प्रतिमा आहेत.








६) नवग्रह जैन मंदिर ः

नवग्रह जैन मंदिर हे कर्नाटकातील हुबळी जवळील वरूर येथे आहे.श्री गुणधर महाराज यांच्या देखरेखीखाली सन २००५ मध्ये याचे बांधकाम केले गेले. या मंदिरात भगवान पार्श्वनाथांची ६१ फूट उंचीची मूर्ती विराजमान आहे. याशिवाय येथे ८ तीर्थंकरांच्या ही मुर्ती आहेत.









७) लक्ष्मेश्वर जैन मंदिर, लक्ष्मेश्वर ः


लक्ष्मेश्वर जैन मंदिर हे कर्नाटकातील गदग जिल्हातील लक्ष्मेश्वर शहरातील जैन मंदिरांचा समूह आहे. लक्ष्मेश्वर हे प्राचीन जैन केंद्रापैकी एक आहे. त्याला हुग्लीगेरे आणि पुलिगेरे म्हणून ओळखले जात होते. तेथे दोन बसदी असून, एक शंख बसदी आणि दुसरी अनंतनाथ बसदी आहे. शंख बसदी ला सहस्रकूट जिनालय ही म्हणतात. ती भगवान नेमिनाथांना समर्पित आहे. अनंतनाथ बसदी ही १२ व्या शतकात बांधली गेली. हे मंदिर साबण्याच्या दगडाचा वापर करून बांधण्यात आले आहे. ती भगवान अनंतनाथांना समर्पित आहे.



८) मीना बसदी, ऐहोळे ः

मीना बसदी ही कर्नाटकातील ऐहोळे येथे आहे. इ.स. च्या ६ व्या ते १२ व्या शतकातील १0 जैन स्मारकाचे चार संग्रह तेथे आहेत. मेगुटी टेकडी येथील जैन मंदिर भगवान महावीरांना समर्पित आहे. तसेच जैन गुहाही आहेत.





९) जैन तीर्थक्षेत्र आरतीपुरा ः

जैन तीर्थक्षेत्र हे कर्नाटकात असून ज्याला कनकद्री आणि हेमंत असेही म्हणतात. येथे भगवान महावीरांनी या भागाला भेट देऊन समवशरण दिव्य सभा घेतल्याचा उल्लेख आहे. येथे ५ व्या शतकातील पार्श्वनाथांचे मंदिर गंगा घराण्यातील राजांनी बांधले होते. तेथे श्रवणबेट्टा (दोडा बेट्टा) आणि कनकगिरी (चिक्का बेट्टा) ठिकाण आहेत.







१०) श्री सहस्त्रकूट दिगंबर जैन बसदी, अर्सिकेरेः

श्री सहस्त्रकूट दिगंबर जैन बसदी हे मंदिर कर्नाटकातील हसन जिल्हात अर्सिकेरे येथे आहे. सहस्त्रकूट म्हणजे मध्यवर्ती चौथरा आहे, ज्याच्या बाजूला जिनांच्या १००८ लहान प्रतिमा कोरलेल्या आहेत.











११) श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, बाबानगरः

श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे कर्नाटकातील विजापूर जिल्हामधील बाबानगर येथे आहे. हे अतिशय क्षेत्र हिरव्या काळया पाषाणापासून बनवलेल्या भगवान पार्श्वनाथांच्या आकर्षक अनोख्या आणि प्राचीन मुर्तीसाठी प्रसिद्ध आहे जी चमत्कारिक आहे.





१२) श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन बसदी, उमथुर ः

श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन बसदी हे कर्नाटकातील चामराजनगर जिल्हातील उमथुर येथे आहे. हे एक प्राचीन दिगंबर जैन मंदिर आहे.





१३) श्री चंद्रनाथ स्वामी दिगंबर जैन मंदिर, श्री केशत्रपाल ब्रह्मदेव सन्निधी हट्टीयांगडी ः

श्री चंद्रनाथ स्वामी दिगंबर जैन मंदिर, श्री केशत्रपाल ब्रह्मदेव सन्निधी हे कर्नाटकातील उडपी जिल्हातील हट्टीयांगडी येथे आहे. ही अतिशय प्राचीन दिगंबर

जैन मंदिर आहे. येथे श्री चंद्रप्रभू भगवान हे मुलनायक आहेत. तसेच येथे पार्श्व नाथ भगवान, पद्मावती माता आणि श्री केशत्रपाल ब्रह्मदेव यांचाही समावेश आहे.







१४) प्राचीन दिगंबर जैन मंदिर, मुल्लूर ः

हे प्राचीन दिगंबर जैन मंदिर कर्नाटकातील कोडगू जिल्हातील मुल्लूर निधा येथे आहे. ही अतिशय प्राचीन दिगंबर जैन मंदिर आहे. हे इ.स. च्या १0 व्या शतकातील आहे. ही बसदी भगवान पार्श्वनाथ, भगवान शांतीनाथ आणि भगवान चंद्रप्रभू या तिर्थंकरांना समर्पित आहे.







१५) कमल बसदी, बेळगाव ः

हे दिगंबर जैन मंदिर कर्नाटकातील बेळगाव शहरातील किल्ल्याच्या आत आहे. कमल बसदी हे नाव मध्यवर्ती छताच्या घुमटापासून पसरलेल्या कमळाच्या कोरीव कामावरून पडले आहे. कमळात भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यातील २४ तीर्थंकराचे प्रतिनिधित्व करणा या ७२ पाकळया आहेत. या मंदिरात मुलनायक नेमिनाथाची काळया रंगाची मूर्ती आहे. या मंदिरात पद्मासन मुद्रा असलेल्या भगवान आदिनाथ, कायोत्सर्ग मुद्रातील भगवान सुमतिनाथ आीन वरच्या बाजूस सात डोके

असलेल्या भगवान पार्श्वनाथाच्या मूर्ती आहेत. किल्लातील दोन मंदिरापैकी दगडी कोरीव चौथरावर काळया पाषाणावर नेमिनाथाची मूती असलेली कमल बसदी आहे. दुसरी चिक्की बसदी भग्नावस्थेत आहे.









१६) ब्रह्म जिनालय ः

हे दिगंबर जैन मंदिर कर्नाटकातील गदग जिल्हातील लक्कुंडी येथे आहे . त्याला ब्रह्म जिनालय किंवा लक्कुंडी जैन मंदिर आहे . हे मंदिर ११ व्या शतकातील भगवान महावीर मंदिर आहे. मंदिराबाहेर ४ फूट उंच काळया बनवलेली आणि सिंहसिंहासनावर विराजमान असलेली भगवान महावीराची प्रतिमा आहे . मुलनायक म्हणून भगवान नेमिनाथांची मूर्ती आहे .











१७) श्री १००८ भगवान चिंतामणी पार्श्वनाथ व श्री धर्मेंद्र पद्मावती दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, हुंसीहदगिल ः

श्री १००८ भगवान चिंतामणी पार्श्वनाथ व श्री धर्मेंद्र पद्मावती दिगंबर जैन अतिशय क्षेत्र कर्नाटकातील कलबुर्गी जिल्हातील हुंसीहदगिल येथे आहे .







१८) श्री शांतीनाथ भगवान आणि श्री ज्वालामालिनी देवी जैन मंदिर, नित्तूर ः

श्री शांतीनाथ भगवान आणि श्री ज्वालामालिनी देवी जैन मंदिर हे कर्नाटकातील तुमकुरू जिल्हातील नित्तूर येथे आहे. हे मंदिर ११७५ मध्ये बांधले गेले. येथे मुलनायक म्हणून भगवान आदिनाथांची मूर्ती होती पण कालांतराने ती नष्ट झाली. शांतीनाथ भगवान मुर्ती ची स्थापना १९६९ साली करण्यात आली.







१९) श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, अम्मर मोहल्ला, हसन ः

श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे कर्नाटकातील हसन येथे आहे. हे एक प्राचीन मंदिर आहे.









२०) श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, भोज ः

श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे कर्नाटकातील बेळगाव जिल्हातील भोज येथे आहे. तसेच भोज मध्ये शांतीसागर महाराजाचे मंदिर आहे.






STATUE
OF PEACE



२. महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे

१) श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, कवठे पिराण ः

श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, कवठे पिराण हे महाराष्ट्रातील सांगली जिल्हातील गाव आहे. तेथे मुलनायक आदिनाथ भगवंताचे मुर्ती असलेले मंदिर आहे. या मंदिरात काच मंदिर ही बनविले होते. ते या परिसरात प्रसिध्द होते. आता या मंदिराचे जिर्णोधाराचे काम चालू आहे.











२) श्री अतिशय क्षेत्र वृषभंचल दिगंबर जैन मंदिर ः

श्री अतिशय क्षेत्र वृषभंचल दिगंबर जैन मंदिर हे कोल्हापूर जिल्हामधील नांदणी येथे आहे. नांदणी हे १२०० वर्षांहून अधिक इतिहास असलेले एक प्राचीन जैन केंद्र आहे. तेथे भट्टरक आसन असलेले जैन मठ आहे. भट्टारकाला श्री जिनसेन भट्टारक स्वामीजी म्हणतात. दिगंबर जैन समाज मार्गदर्शनासाठी या मठाच्या भट्टारकाकडे पाहतो. या मठाची रचना अतिशय प्राचीन असून ती ३०० खांबांवर उभी असून त्यातील बहुतेक खांबांची निर्मिती लाकडापासून करण्यात आली आहे. नांदणी मध्ये ४ दिगंबर जैन मंदिरे असून जैन मठाच्या शेजारी ३ मंदिरे असून त्यापैकी २ तीर्थंकर आदिनाथांना समर्पित आहेत. त्यातील एक पुरातन मंदिर १०व्या शतकातील आहे येथे हिरव्या रंगाची दगडी मूर्ती आहे आणि दुसरे नवीन आहे. मुख्य देवता म्हणून कायोत्सर्गातील तीर्थंकर आदिनाथ आहेत. पद्मासनात तीर्थंकर पार्श्वनाथांची मूर्ती, भगवान बाहुबली आणि इतर तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. तेथे तीर्थंकर आदिनाथ जैन मंदिर इ.स. १८९४ मध्ये बांधण्यात आले. मुख्य देवता म्हणून तीर्थंकर आदिनाथांची काळया रंगाची मूर्ती आहे. या दोन्ही मंदिराच्या शेजारी वसलेले एक छोटेसे पद्मावती मंदिर आहे. तेथे गावातच पार्श्वनाथांचे मंदिर असून पद्मासनात तीर्थंकर पार्श्वनाथांची काळया रंगाची मूर्ती आहे.

श्री अतिशय क्षेत्र वृषभंचल दिगंबर जैन मंदिर हे जैन मठापासून २ किमी अंतरावर आहे. तेथे ३१ फूट उंचीची तीर्थंकर आदिनाथांची मूर्ती आहे. तसेच तेथे २४ तीर्थ ंकराच्या काळया रंगाच्या कायोत्सर्गातील मुर्त्या असून त्याला चोविस तीर्थंकर मंदिर म्हणतात. तेथे पद्मासनात तीर्थंकर पार्श्वनाथांची काळया रंगाची मूर्ती आणि भगवान बाहुबलीची एक छोटी दगडी मूर्ती आहे. तसेच तेथे २४ तीर्थंकराच्या चरणांची स्वतंत्र मंडपात प्रतिष्ठापणा केली आहे.





३) श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, इब्राहिमपूर ः

श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हातील इब्राहिमपूर येथे आहे. हे जुने दिगंबर जैन मंदिर असून हे भगवान पार्श्वनाथांना समर्पित आहे.











४) श्री १००८ आदिनाथ भगवान दिगंबर जैन अतिशय क्षेत्र भातुकली ः

श्री १००८ आदिनाथ भगवान दिगंबर जैन अतिशय क्षेत्र भातुकली हे ठिकाण महाराष्ट्रातील अमरावती जिल्हामध्ये आहे. या मंदिरामध्ये काळया दगडापासून बनविलेल्या भगवान आदिनाथांच्या प्राचीन मुर्तीसाठी प्रसिद्ध आहे. ही मुर्ती ३००० वर्षाहून अधिक जुनी आहे.







५) स्वयंभू श्री १००८ पार्श्वनाथ भगवान दिगंबर जैन मंदिर, वशी ः

स्वयंभू श्री १००८ भगवान पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर वशी हे ठिकाण महाराष्ट्रातील सांगली जिल्हामध्ये आहे . भगवान पार्श्वनाथांची ही मुर्ती येथे सापडली आहे .







६) जैन लेणी शहादा ः

महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हातील शहादा (मोहिंदे हवेली) येथे जैन लेणी आहेत. गोमती नदीच्या वाहत्या पाण्यात ५६ मुर्ती असलेले गुहा मंदिर आहे. हे २००० वर्षाहून अधिक जुने आहे. मुख्य शिल्प हे भगवान महावीरांचे आहे.




श्री भारतवर्षीय दिगम्बर जैन तीर्थ संरक्षिणी महासभा दील्ली
दिगम्बर जैन गुफा १
दिगम्बर जैन मंदिर १









७) श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर अतिशय क्षेत्र, सावरगाव ः

श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर अतिशय क्षेत्र हे महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हातील सावरगाव (कोटी) येथे आहे. हे ११०० वर्ष जुने प्राचीन विशाल भव्य जिनालय आहे. हे मंदिर काळया दगडापासून बनविले आहे. येथे भगवान पार्श्वनाथांची भव्य आकर्षक मनमोहक मुर्ती आणि इतर मुर्ती २०० वर्षा पुर्वी सापडल्या आहेत.













८) वेरूळ जैन लेणी ः

वेरूळ जैन लेणी या महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हात आहेत. गुहा ३१ ही चार खांबांची वास्तू असून तेथे भगवान महावीराची मूर्ती विराजमान आहे.



गुहा ३४ मध्ये भगवान पार्श्वनाथांचे मोठे कोरीव काम आहे.



९) श्री दिगंबर जैन प्राचीन तीर्थक्षेत्र, अंजनगिरी, अंजनेरी ः

श्री दिगंबर जैन प्राचीन तीर्थक्षेत्र, अंजनगिरी हे महाराष्ट्रातील नाशिक जिल्हातील अंजनेरी येथे आहे. हे १000 वर्षा पासून हे जैन तीर्थक्षेत्र आहे.










टस से मस नही हुई यह प्रतिमा

अंजनगिरी ग्राम के समीप एक रास्ते पर ३ मंदिर के अवशेष पड़े हुए है। उसके पास ही पेड के नीचे एक पद्मासन आदिनाथ भगवान की काले पाषाण की मुर्ति विराजमान है। इस मुर्ती की विशेषता है कि अंग्रजो के जमाने में इसे इस जगह से हिलाकर दूसरी जगह रखने की बहोत बार कोशिश हुई पर सारी कोशिश व्यर्थ हुई। यह मुर्ति टस से मस नहीं हुई।

कई सालों से यह मुर्ति रास्ते से ५ फिट पर एक छोटे से चबुतरे पर रखी हुई है। जो आनेजाने वाले को आसानी से दिखती है। गांववाले इसे चमत्कारी प्रतिमा मानते है। और इसपर श्रध्दा रखते है।

कमिटी द्वारा क्षेत्र पर कार्यरत होने के पश्चात इसे सुरक्षित किया गया। आर्किलाजिकल द्वारा इसे कंपाउंड बनाकर संरक्षित भी किया गया है। समिती द्वारा हर पोर्णिमा को इसका विशेष अभिषेक किया जाता है।





१०) श्री दिगंबर जैन धर्मक्षेत्र रत्नात्रेयगिरी मंदिर, कामठे ः

श्री दिगंबर जैन धर्मक्षेत्र रत्नात्रेयगिरी मंदिर हे महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्हातील चिपळूण तालुक्यातील कामठे येथे आहे. परमपूज्य आचार्य श्री सोमसेन महाराज यांच्या आशिर्वादाने या विशाल आणि पवित्र तीर्थक्षेत्राचा विकास होत आहे.









११) श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, रामटेक ः

श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे महाराष्ट्रातील नागपूर जिल्हामधील रामटेक येथे आहे. भगवान शांतीनाथ हे मुलनायक असून त्यांची १३ फूट ५ इंचाची खड्गासन प्रतिमा आहे. त्यांचा दोन्ही बाजूला ५ फूट २ इंचाची भगवान कुंथुनाथ आणि भगवान अरहनाथ यांचा खड्गासन प्रतिमा आहते.









१२) श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन तीर्थ ः

श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन तीर्थ हे महाराष्ट्रातील पूणे जिल्हातील इंदापुर येथे आहे. हे मंदिर भगवान शांतीनाथांना समर्पित आहे. येथे भगवान मुनिसुव्रतनाथांची २७ फूट उंच मुर्ती आहे.









१३) कचनेर जैन मंदिर ः

हे जैन मंदिर महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हातील कचनेर येथे आहे . श्री १००८ पार्श्वनाथांना हे मंदिर समर्पित आहे . हे २५० वर्ष जुने मंदिर आहे . येथील मुर्तीला चिंतामणी पार्श्वनाथ असेही म्हणतात .









१४) अतिशय क्षेत्र, खिद्रापुर ः

महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हामध्ये खिद्रापुर येथे श्री १००८ भगवान आदिनाथ दिगंबर जैन मंदिर अतिशय क्षेत्र आहे. हे हेमाडपंथी शैलीतील मंदिर आहे. तेथे ६ ते ७ फूटाची भगवान आदिनाथांचे भव्य शिल्प आहे.





१५) श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, ऐनापूरः

श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हामधील ऐनापूर येथे आहे. हे एक प्राचीन जैन मंदिर असून तेथे १२ व्या शतकातील भगवान पार्श्वनाथांची मोहक प्रतिमा आहे.





१६) श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, नळदुर्गः

श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर हे महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हातील नळदुर्ग येथे आहे. हे मंदिर १६ व्या शतकात बांधले गेले आहे.










१७) श्री १००८ केशरीनाथ दिगंबर जैन संस्थान अतिशय क्षेत्र, जामोद ः

श्री १००८ केशरीनाथ दिगंबर जैन संस्थान अतिशय क्षेत्र हे महाराष्ट्रातील बुलडाणा जिल्हातील जामोद येथे आहे. हे मंदिर १७ व्या शतकात बांधले आहे. येथे भगवान आदिनाथांची प्रतिमा आहे. येथे मंदिराच्या भिंतींवर जैन संस्कृती आणि तत्त्वज्ञानावरील भित्तिचित्रे सुंदर रेखाटली आहेत. मंदिराच्या आत आपल्याला जैन पुराणकथांवर आधारित २४ जैन तीर्थंकरांच्या जीवनातील विविध घटनांचे चित्रण आढळते.



१८) भोगोली प्राचीन जैन बसदी **भोगोली** ः

भोगोली प्राचीन जैन बसदी हे कोल्हापूर जिल्हातील चंदगड तालुकातील भोगोली गावातील एक प्राचीन जैन बसदी आहे. ही मंदिरे १000 वर्षाहून जुनी आहेत. येथे जुळी बसदी आहेत आणि या दोन्ही मंदिरात भगवान पार्श्वनाथ हे मुलनायक आहेत.





१९) श्री शांतीसागर दिगंबर जैन आश्रम, शेडबाळ ः श्री शांतीसागर दिगंबर जैन आश्रम हे कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हातील शेडबाळ गावात आहे. भगवान आदिनाथांचे जैन मंदिर तेथे आहे. तेथे २४ तिर्थंकरांच्या प्रतीमा आहेत. तेथे समवशरण मंदिर ही आहे.



२०) कमल मंदिर, **म्हैशाळ** ः

कमल मंदिर हे महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्हातील म्हैशाळ गावात आहे. भगवान मुनिसुव्रतनाथांची प्रतीमा तेथे आहे. तेथे २४ तिर्थंकरांच्या प्रतीमा आहेत.



३. तामिळनाडूतील धार्मिक स्थळे

१) श्री १००८ धर्मनाथ भगवान दिगंबर जैन मंदिर ः

श्री १००८ धर्मनाथ भगवान दिगंबर जैन मंदिर हे तामिळनाडू राज्यातील तिरूवल्लूर जिल्हातील अरूणगुलम या ठिकाणी आहे. तेथे भगवान पार्श्वनाथांची ही मुर्ती आहे.







२) त्रिलोकायनाथ मंदिर, तिरूपर्थीकुंद्रम ः

त्रिलोकायनाथ मंदिर ज्याला थिरूप्परूथीकुंद्रम जैन मंदिर किंवा जीनास्वामी त्रिलोक्यानाथर मंदिर असेही म्हटले जाते. हे भारताच्या तामिळनाडू राज्यातील कांचीपुरम तिरूपर्थीकुंद्रम येथील ८ व्या शतकातील दिगंबर जैन मंदिर आहे.









३) विजयमंगलम जैन मंदिर, विजयमंगलम ः

विजयमंगलम जैन मंदिर हे तामिळनाडू मधील इरोड जिल्हातील विजयमंगलम शहरातील जैन मंदिर आहे. ती भगवान चंद्रप्रभूंना समर्पित आहे. हे मंदिर १000 वर्षांहून जुने आहे.









४) करंदई जैन मंदिर ः

करंदई जैन मंदिर हे तामिळनाडू राज्यातील तंजावर जिल्हातील करंथाई या गावात असलेले दिगंबर जैन मंदिर आहे . हे मंदिर १000 वर्षापूर्वी बांधलेले आहे . भगवान आदिनाथ हे या मंदिराचे प्रमुख दैवत आहेत .



५) श्री १00८ आदिनाथ भगवान दिगंबर जैन मंदिर, अर्पक्कम ः

श्री १00८ आदिनाथ भगवान दिगंबर जैन मंदिर हे तामिळनाडू राज्यातील कांचीपूरम जिल्हातील अर्पक्कम येथे आहे . या मंदिरात एकाच दगडात कोरलेल्या २४ तीर्थंकरांचे शिल्प आहे . या मंदिरात १0 व्या शतकातील आदिनाथ भगवान हे मुलनायक आहेत .







४ . मध्यप्रदेशातील धार्मिक स्थळे

१) हनुमंतल जैन मंदिर जबलपूर ः

हनुमंतल जैन मंदिर मध्यप्रदेशातील जबलपूर येथे आहे . हे मंदिर १६८६ साली बांधलेले आहे . १९२८ साली आचार्य शांतीसागर महाराजांनी या मंदिराला भेट दिली होती . येथे भगवान आदिनाथाची मुख्य मुर्ती आहे .







२) बावनगजा, मध्यप्रदेश ः

बावनगजा हे जैन समुदायाचे पवित्र स्थान मानले जाते. हे ठिकाण मध्यप्रदेशातील बडवानी जिल्हामधील बावनगजा येथे आहे. येथे १२ व्या शतकात बांधलेले ८ प्रभावशाली जैन मंदिरे आहेत. सातपुडा पर्वतरांगेच्या पायथ्याशी असलेल्या खडकाळ प्रदेशातून बाहेर पडणारा पहिला तीर्थंकर आदिनाथ यांचा ८४ फूट उंचीचा महापाषाण कालीन पुतळा या ठिकाणी आहे. योगमुद्रात उभी असलेली ही विशाल मूर्ती तपकिरी दगडातून कोरलेली आहे.





३) श्री दिगंबर जैन सिध्द क्षेत्र, मुक्तागिरीः

श्री दिगंबर जैन सिद्धक्षेत्र हे मध्यप्रदेशातील बैतुल जिल्हामधील मुक्तागिरी येथे आहे. येथे भगवान शितलनाथांचा समवशरण आले होते असा उल्लेख आहे. येथे पहाडावर ५२ जिन चैत्यालय आहेत. यातील काही अति प्राचीन आहेत तर काही १६ व्या शतकातील. पहाडावर जाण्यासाठी २५० पायरा आहेत. येथे २५०० वर्षा पुर्वीची मुलनायक भगवान पार्श्वनाथांची ४ फूट उंच काळा पाषाणातील पद्मासनातील मूर्ती विराजमान आहे.





४) पटाईदेवी जैन मंदिर ः

पटाईदेवी किंवा पाटैनी जैन मंदिर हे गुप्त साम्राज्याच्या कारकिर्दीत बांधलेले आणि मध्यप्रदेशातील उंचेहरा शहराजवळ असलेले ५ व्या शतकातील जैन मंदिर आहे. हे मंदिर भगवान नेमिनाथांना समर्पित आहे.

